सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता “सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम” अंतर्गत सामाजिक वनीकरण विभागाकडील अटल आनंद घन वन योजनेच्या प्रथम वर्ष चालू बाब प्रस्तावांच्या अनुषंगाने निधी वितरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः साववि-२०२६/प्र.क्र.४६/वने-११
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १० ऑगस्ट, २०२६

वाचा:-

१) नियोजन (रोहयो) विभाग, शासन निर्णय क्र.मग्रारो-२०१८/प्र.क्र.१३८/मग्रारो-१, दि.०५.११.२०१८
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक-साववि-२०१९/प्र.क्र.०३/फ-११, दि.२५.०६.२०१९
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक-साववि-२०२२/प्र.क्र.५८/फ-११, दि.२८.०७.२०२३
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं -२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा.,नागपूर यांचे कार्यालय, क्रमांक कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.३६/४३१/२०२६-२७, दि.१३.०७.२०२६
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा.,नागपूर यांचे कार्यालय, क्रमांक कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.३६/४४५/२०२६-२७, दि.१६.०७.२०२६
७) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), म.रा.,नागपूर यांचे कार्यालय, क्रमांक कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.७५/४५३/२०२६-२७, दि.१७.०७.२०२६

प्रस्तावना:-

वन आणि वनेत्तर क्षेत्रात वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरीता सन २०२६-२७ या वर्षाकरीता “सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम” या राज्य योजनेंतर्गत लेखाशीर्ष ४४०६ ०४९२ अंतर्गत रु.५००००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

०२. वित्त विभागाच्या वाचा क्र.४ येथील दि.०९.०४.२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये वित्तीय वर्ष सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय तरतूदींची मासिक निधी विवरणपत्रे, अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीवर (बीम्स) प्रशासकीय विभागांकडून नोंदविण्यात आल्यानंतर सन २०२६-२७ च्या प्रथम नऊ माहीकरीता (माहे डिसेंबर, २०२६ अखेर) आवश्यक असणारा अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्क्यांच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणालीव्दारे (बीम्स) वितरीत करण्यात येत आहे.

०३. वाचा क्र.३ येथील दि.२८.०७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये वनीकरण तसेच वन क्षेत्रातील मृद व जलसंधारणाची सर्व कामे ही महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व वन विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे अभिसरण करून घेण्यास व उर्वरित फरकाची रक्कम राज्य योजनेंतर्गत उपलब्ध तरतुदीमधून अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार “सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम” या योजनेंतर्गत करण्यात येणारी कामे सुध्दा अभिसरणांतर्गत करणे आवश्यक आहे. तथापि, वाचा क्र.१ येथील नियोजन विभागाच्या (रोहयो प्रभाग) दि.०५.११.२०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ मधील अनुक्रमांक ११ नुसार अभिसरणांतर्गतची कामे ही ग्रामीण क्षेत्रामध्येच घेणे बंधनकारक आहे. यास्तव, “सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम” या योजनेंतर्गत शहरी भागातील म्हणजेच महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, लष्करी छावणी व औद्योगिक क्षेत्रातील प्रस्ताव राज्य योजनेतून मंजूर करण्यात येत आहेत.

०४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयाने वाचा क्रमांक ५ ते ७ येथील प्रस्तावांन्वये सन २०२६-२७ या वर्षाकरीता “सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम” या राज्य योजनेंतर्गत सामाजिक वनीकरण वनवृत्त पुणे, नाशिक व छत्रपती संभाजीनगर यांच्याकडील प्रथम वर्ष बांधील कामांच्या चालू बाब प्रस्तावांच्या अनुषंगाने निधी वितरीत करण्याची मागणी केली आहे. त्यास अनुसरून वित्त विभागाने वाचा क्र.४ येथील दि.०९.०४.२०२६ च्या परिपत्रकान्वये बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेल्या मर्यादेत निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात “सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम” या योजनेंतर्गत सामाजिक वनीकरण वनवृत्त पुणे, नाशिक व छत्रपती संभाजीनगर यांच्याकडील शहरी व औद्योगिक क्षेत्रातील प्रथम वर्ष बांधील कामांच्या चालू बाब प्रस्तावांच्या अनुषंगाने लेखाशीर्ष ४४०६ ०४९२ अंतर्गत निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्यात येत असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

(रू.लाखात)

अ. क्र.	प्रस्ताव क्र. व दिनांक	कामाचा तपशील	वन वृत्त	वन विभाग	क्षेत्र (हेक्टर)	एकूण मागणी		वितरीत करावयाचा निधी		
						०२- मजूरी	२१- साहित्य पुरवठा	०२- मजूरी	२१- साहित्य पुरवठा	एकूण
१.	क्र.४३१, दि.१३.०७.२०२६	अटल आनंद घन वन अंतर्गत रोपवनाची कामे (प्रथमवर्ष कामे)	पुणे (सा.व.)	सातारा	२०.६०	९०.६४	९९४.३४	९०.६४	१९८.८७	२८९.५१
				एकूण	**२०.६०**	**९०.६४**	**९९४.३४**	**९०.६४**	**१९८.८७**	**२८९.५१**
२.	क्र.४४५, दि.१६.०७.२०२६	अटल आनंद घन वन अंतर्गत रोपवनाची कामे (प्रथमवर्ष कामे)	नाशिक (सा.व.)	नाशिक	१०.०५	४४.२५	३७४.७७	४४.२५	७४.९५	११९.२०
				अहिल्यानगर	२२.४५	९८.८६	७४७.३१	९८.८६	१४९.४६	२४८.३२
				जळगाव	२७.९०	१२४.६२	१०९५.२५	१२४.६२	२१९.०५	३४३.६७
		अटल आनंद घन वन अंतर्गत रोपवनाची कामे (पुर्वपावसाळी प्रलंबित निधी+ प्रथम वर्ष)		नंदुरबार	१.००	५.१९	३९.७५	५.१९	७.९५	१३.१४
				एकूण	**६१.४०**	**२७२.९२**	**२२५७.०८**	**२७२.९२**	**४५१.४२**	**७२४.३४**

३.	क्र.४५३, दि.१७.०७.२०२६	अटल आनंद घन वन अंतर्गत रोपवनाची कामे (प्रथमवर्ष कामे)	छत्रपती संभाजी नगर (सा.व.)	छत्रपती संभाजी नगर	२२.९०	१००.८४	९१२.३१	१००.८४	१८२.४६	२८३.३०
					१.९०	८.१८	६४.७१	८.१८	१२.९४	२१.१२
					१.९०	८.१८	६४.७१	८.१८	१२.९४	२१.१२
				नांदेड	३५.९०	२२२.०६	१०३६.७९	२२२.०६	२०७.३६	४२९.४२
				बीड	१३.५०	७५.०९	४१७.०८	७५.०९	८३.४२	१५८.५१
				धाराशिव	२५.७०	११४.९३	१०३७.९८	११४.९३	२०७.६०	३२२.५३
				जालना	५.४०	३५.८२	१६३.५९	३५.८२	३२.७२	६८.५४
				लातूर	२७.१५	१६९.८८	९५४.६७	१६९.८८	१९०.९३	३६०.८१
				परभणी	१३.५०	५९.४५	४३८.५२	५९.४५	८७.७०	१४७.१५
				हिंगोली	८.०५	३५.४५	२३४.४०	३५.४५	४६.८८	८२.३३
				एकूण	**१५५.९०**	**८२९.८८**	**५३२४.७६**	**८२९.८८**	**१०६४.९५**	**१८९४.८३**
				एकंदर एकूण	**२३७.९०**	**११९३.४४**	**८५७६.१८**	**११९३.४४**	**१७१५.२४**	**२९०८.६८**

२. उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार सन २०२६-२७ या वर्षाकरीता “सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम” या योजनेंतर्गत लेखाशिर्ष ४४०६ ०४९२ अंतर्गत **०२-मजूरी या उद्दिष्टाखाली रु.११९३.४४ लक्ष व २१-साहित्य व पुरवठा या उद्दिष्टाखाली रु.१७१५.२४ लक्ष असे एकूण रु.२९०८.६८ लक्ष (अक्षरी रूपये एकोणतीस कोटी आठ लक्ष अडुसष्ठ हजार मात्र) निधी वितरीत करण्यात येत आहे.**

३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर कामांना निधी वितरीत करताना वन वृत्त/विभाग निहाय कामांचा तपशिल तपासूनच तसेच राज्य योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेले **रोपवनांचे क्षेत्र शहरी भागात म्हणजेच महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, लष्करी छावणी व औद्योगिक क्षेत्रात येत असल्याचे संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रमाणित केल्याची खात्री करूनच** कार्यवाही करावी.

४. सदर निधी नियंत्रक अधिकारी म्हणून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी यांनी सदर निधी तात्काळ वितरीत करून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. या योजनेंतर्गत करण्यात आलेल्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्यात आली आहे, याबाबतची दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे वर्ष २०२६-२७ मध्ये सदर योजनेंतर्गत वितरीत केलेल्या निधीबाबत उपयोगिता प्रमाणपत्र ७ दिवसांत शासनास सादर

करतील. <u>**सदर निधी वितरीत करताना करण्यात येत असलेली कामे ही वाचा क्र.२ व ३ येथील शासनास निर्णयातील तरतुदी, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना तसेच सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिलेल्या अंदाजपत्रकानुसार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्याची खातरजमा नियंत्रक अधिकारी यांनी करावी.**</u> तसेच सदर निधी खर्च करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करण्याबाबतच्या सूचना सुद्धा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संबंधीतांना देव्यात.

६. सदर निधी वितरित करण्यापूर्वी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर योजनेसाठी **सन २०२६-२७ करीता वितरित केलेला निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली व्यतिरिक्त अन्यत्र ठिकाणी वळता केला नसल्याची खात्री करावी.**

७. वन वृत्त/विभाग निहाय वितरीत तरतुदींची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत व्हावे.

८. सदर योजनेंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२६ च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र.सी-१०,
४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च,
(००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपन (४४०६ ०४९२)
०२- मजूरी, २१- साहित्य व पुरवठा

९. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचे दि.०९.०४.२०२६ रोजींचे परिपत्रक तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक-विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८१०१८३६५०४९४० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAP RAJENDRA SATPUTE

Digitally signed by PRATAP RAJENDRA SATPUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=46e55cdbf3321ecaa0de879cc768619afcdbda90e6691b3baf2255384355942f, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=47A54DFAE5D873AD7624C29CACBF61D571ADA2CBEECE334AB2E56A179C9FF19F, cn=PRATAP RAJENDRA SATPUTE
Date: 2026.08.10 18:37:50 +05'30'

(प्रताप राजेंद्र सातपुते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
५. वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण (६ वृत्त)
६. उप वनसंरक्षक (प्रादेशिक)/विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण) (सर्व जिल्हे)
७. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
१०. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई

११. वित्त विभाग, व्यय-१०,अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१२. कार्यासन अधिकारी, वने-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती वने-११.